**दिवाणी किरकोळ अर्ज १५८/२०२४**
**भामाबाई वि प्रेमा**
**निशाणी क्र. ३५**

**<u>गैरअर्जदार तर्फे उलट तपास श्री एस.आर. लोमटे यांच्या मार्फत –</u>**

माझे वय ५५ वर्ष आहे. हा वाद जमीन गट क्र. ४२०/१ मौजे सिंदफळ ता. तुळजापूर जि. धाराशिव संबंधीचा आहे . हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीचा जमीनीचा सबंधीचा दस्त हा खरेदीखताचा आहे. साक्षीदार स्वताहुन सांगतो की, ते गहाण खत आहे. तो दस्त मी वाचुन पाहिलेला आहे. त्या दस्तामध्ये कायम खुष खरेदीखत करुन दिले असे नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई यांनी साधु क्षिरसागर यांच्या हक्कात कायमस्वरुपी खरेदीखत करुन दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याअधारे साधु क्षिरसागर यांचे नाव सातबारा व महसुल अभिलेखात लागले आहे. गट क्र. ४२०/१ सबंधी महसुल अभिलेखाला माझे आईचे नाव आहे. त्या गटक्रमांकासंबधी प्रेमा साधु क्षिरसागर यांचे देखील नाव आहे. साधु क्षिरसागर यांच्या मृत्युनंतर त्यांचे वारसाचे नावे जमीन झाली त्या फेरफाराला आम्ही कुठेही अहवान केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, तो कायम स्वरुपी खरेदीखत असल्यामुळे आम्ही त्याला अहवान दिलेले नाही. साधु क्षिरसागर व माझे आईमध्ये माझ्या सांगण्याप्रमाणे गहाणखताचा किंवा सावकाराची व्यवहार होता हे दर्शविण्यासाठी कुठलाही कागदोपत्री पुरावा माझ्याजवळ नाही. मी गहाणखताच्या व्यवहारविरुध्द कोणताही दावा किंवा तक्रार दाखल केलेली नाही.

हे म्हणणे खरे आहे की, १९९० माझे भाउ खुप आजारी होते त्यांच्या उपचाराकरिता पैशाची गरज होती. परंतु हे म्हणणे खरे नाही की, पैशाच्या गरजेपोटी आम्ही ती जमीन साधु क्षिरसागर यांना कायमस्वरुपी विक्री केली. त्या व्यवहाराच्यावेळी माझे वय १६ वर्षे होते. मी त्यावेळी सिंदफळ येथे राहायला होतो. हे म्हणणे खरे नाही की, या व्यवहाराला मी हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या दस्तावर माझी स्वताची स्वाक्षरी नाही. सिदंफळ गाव हे सोलापूर ते धुळे या महामार्गावर लगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या महामार्गासाठी ही जमीन शासनाने संपादीत केली. हे म्हणणे खरे आहे की, ज्यांची जमीनी संपादीत करण्यात आल्या त्यांना या जमीनीचा भरपूर मावेजा मिळाला. साधु क्षिरसागर यांची जमीन महामर्गासाठी संपादीत करण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अभिलेखामध्ये प्रेमा साधु क्षिरसागर हिचे नावे गट क्र. ४२०/१ ही जमीन संपादीत करण्यात आलेली आहे. आता सांगतो की, प्रेमा साधु क्षिरसागर यांचे नावे असलेली गट क्र. ४२०/१ ही जमीन संपादीत झालेली आहे. व त्यासंबंधीचा निवाडा मी दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, की माझे

**दिवाणी किरकोळ अर्ज १५८/२०२४**

**भामाबाई वि प्रेमा**

**निशाणी क्र. ३५**

शपथपत्रातील मजकुर आहे व आमचा व्यवहार सावकारी किंवा गहाणखताचा होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार यांना संपादनाची रक्कम मिळू नये म्हणून मी खोटी साक्ष देत आहे.

हे म्हणणे खरे आहे की, त्या जमीनीसंबधी गहाणखत रदद करावा म्हणुन तुळजापूर न्यायालयात दिवाणी दावा क्र. ३४८/२०१५ हा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, तो दावा प्रलंबीत असताना धाराशिव दिवाणी न्यायालय व. स्तर यांच्या न्यायालयात पुन्हा जिल्हाधिकारी यांना पक्षकार करुन नियमीत दिवाणी दावा क्र. १६३/२०१६ हा दावा दाखल केला होता. ते दोन्ही दावे न चालवता खारीज झाले आहे. साक्षीदार स्वताहुन सांगतो की, त्यांना पुन्हा बोर्डावर घेणेसाठी कार्यवाही दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, ते दावे प्रलंबीत असल्यामुळे आनुदानाची रक्कम वाटप करण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की,खोटी तक्रार जिल्हाधीकारी यांचेकडे दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे शपथपत्र दाखल करुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

Digitally signed by KHWAJA FAROOQ AHMED KHWAJA MANZURUDDIN
Date: 2026.07.24 11:11:18 +0530

दि. ०४.०७.२०२६

( डॉ.एफ.ए. एम.ख्वाजा )
जिल्हा न्यायाधीश-१, उस्मानाबाद

**दिवाणी किरकोळ अर्ज १५८/२०२४**

**भामाबाई  वि प्रेमा**

**निशाणी क्र. ३५**

सरकार **तर्फे साक्षीदार** क्र. ८ **ची जबानी शपथेवर निवेदन की,**

| | |
|---|---|
| माझे नांव | : भारत लक्ष्मण फेरे |
| माझे वय | : ५९ वर्षे, |
| माझा व्यवसाय | : शेती |
| माझे राहण्याचे ठिकाण | : कात्री  ता.तुळजापूर, जि. उस्मानाबाद . |

**सरतपासणी श्रीमती एन. वाय. साबळे  विशेष शासकीय अभियोक्ता यांचेमार्फत–**

१.

२.

३.

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. ए.एस.वरुडकर यांच्यातर्फे–**

उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

दि. १७.०६.२०२६

( डॉ.एफ.ए.के. एम.ख्वाजा )
विशेष न्यायाधीश, उस्मानाबाद

**दिवाणी किरकोळ अर्ज १५८/२०२४**

**भामाबाई वि प्रेमा**

**निशाणी क्र. ३५**

सरकार **तर्फे साक्षीदार** क्र. १ **ची जबानी शपथेवर निवेदन की,**

माझे नांव : भारत लक्ष्मण फेरे

माझे वय : ५९ वर्षे,

माझा व्यवसाय : शेती

माझे राहण्याचे ठिकाण : कात्री ता.तुळजापूर, जि. उस्मानाबाद .

**सरतपासणी श्रीमती एस.एस.सुर्यवंशी विशेष शासकीय अभियोक्ता यांचेमार्फत–**

१.

२.

३.

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. वाय.डी.खैरे यांच्यातर्फे–**

उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

दि. १७.०६.२०२६

( डॉ.एफ.ए.के. एम.ख्वाजा )
विशेष न्यायाधीश, उस्मानाबाद